(17)

# अभियांत्रिकीच्या ७ हजार विद्यार्थ्यांना शुल्क प्रतिपूर्ती

प्रतिनिधी | नाशिक

शैक्षणिक वर्ष २०१३ व २०१४ मध्ये नव्याने सुरू झालेली अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतन त्याबरोबरच जुन्या महाविद्यालयांतील नवीन शाखांमध्ये प्रवेश घेतलेल्या अशा राज्यातील १९२ महाविद्यालयांमधील तब्बल सात हजार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण शुल्क परत देण्याचे (प्रतिपूर्ती) आदेश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य शासनाला दिले.

या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क परत न देण्याचा निर्णय शासनाने मे २०१३ मध्ये घेतला होता. ज्या महाविद्यालयाने 'एआयसीटीई'साठी थेट अर्ज केलेला आहे, ज्या महाविद्यालयांबाबत शासनाने नकारात्मक शिफारस केलेली आहे, अशा 'एआयसीटीई'ने मंजूर केलेल्या उर्वरित. पान १२

पान १ वरून

## ...७ हजार विद्यार्थ्यांना शुल्क प्रतिपूर्ती

महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी परत दिली जाणार नाही, असा हा निर्णय होता. त्या विरोधात 'असोसिएशन ऑफ द मॅनेजमेंट ऑफ अन-अँडेड इंजिनिअरिंग कॉलेजेस (महाराष्ट्र)' व 'असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ पॉलिटेक्निक्स' या दोन संघटनांनी दिलेल्या आव्हानासह एकूण २५ याचिका जून २०१३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात दाखल झाल्या. त्यात ९९ अभियांत्रिकी महाविद्यालये व ९३ तंत्रनिकेतन अशा एकूण १९२ संस्थांशी संबंधित होत्या. महत्त्वाचे म्हणजे त्यातील सात हजार मागासवर्गीय विद्यार्थी प्रतिपूर्तीसाठी पात्र होते. त्यांना या निर्णयामुळे भरलेले शिक्षण शुल्क परत मिळेल. न्यायालयाच्या निर्णयामुळे राज्यभरातील लाभार्थी विद्यार्थ्यांना दिलासा मिळाल्याची माहिती असोसिएशनचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी दिली.

### अशी मिळते प्रतिपूर्ती

अभियांत्रिकीच्या प्रवेशप्रक्रियेत घटनात्मकदृष्ट्या ५० टक्के जागा मागासवर्गीयांसाठी राखीव आहेत. त्यानुसार सात हजार विद्यार्थ्यांनी या कोट्यातून 'कॅप' द्वारे प्रवेश घेतलेले आहेत. त्यांना शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती देण्यासाठी दरवर्षी ४३१ कोटी रुपये केंद्र सरकारकडून मिळतात. तरीही शासनाने ही प्रतिपूर्ती रोखली होती. न्यायालयाच्या निर्णयामुळे राज्य शासनाला ती द्यावी लागणार असून, त्यामुळे तिजोरीवर दरवर्षी १०० कोटींचा अतिरिक्त भार पडणार आहे.

दै.दिव्य मराठी दि.११/९/२०१४

# शिक्षणशुल्क प्रतिपूर्तीचा विद्यार्थ्यांना लाभ मिळणारच

## न्यायालयाच्या निर्णयाने सात हजार विद्यार्थ्यांना लाभ

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १० : शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये नव्याने सुरू झालेल्या अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने व अस्तित्वात असलेली अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतन यांतील नवीन शाखांत प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणशुल्क प्रतिपूर्ती मिळू शकणार आहे. शिक्षणशुल्क प्रतिपूर्ती योजना बंद करण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयाने निकाल जाहीर केल्याची माहिती असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ अन-एडेड इंजिनिअरिंग कॉलेजेसचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी दिली आहे. या निर्णयाचा सात हजार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे.

शासनाच्या निर्णयाविरोधात असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ अन-एडेड इंजिनिअरिंग कॉलेजेस व असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट ऑफ पॉलिटेक्निक्स या दोन असोसिएशनसह एकूण २५ याचिका जून २०१३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. अभियांत्रिकी प्रवेशाच्या वेळी घटनात्मकदृष्ट्या पन्नास टक्के जागा मागासवर्गीयांसाठी राखीव आहेत. यात सात हजार विद्यार्थ्यांना या कोट्यातून कॅपद्वारे प्रवेश देऊनही या विद्यार्थ्यांना फी प्रतिपूर्ती न देण्याचा शासनातर्फे निर्णय घेतला होता. मागासवर्गीयांसाठी राखीव जागांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणशुल्क प्रतिपूर्ती नाकारता येऊ शकत नाही, अशी भूमिका संघटनेने घेतली होती. राज्य शासन केंद्र शासनाची संमती न घेता, तसेच पूर्वसूचना न देता प्रतिपूर्ती योजना रोखू शकत नाही, अशी भूमिका असोसिएशनने न्यायालयात मांडली. या याचिकांची सुनावणी करताना सुमारे सात हजार विद्यार्थ्यांना त्वरित शिक्षणशुल्क प्रतिपूर्ती योजना लागू करावी, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. यामुळे शासनाच्या तिजोरीवर दरवर्षी शंभर कोटींचा अतिरिक्त भार पडणार आहे. असोसिएशनतर्फे ॲड. निखिल साखरदांडे, ॲड. चंदना साळगावकर, ॲड. संदीप वाघमारे व ॲड. एन. बी. खंदारे यांनी काम पहिले.

दै.सकाळ दि.११/९/२०१४

# अभियांत्रिकीच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी मिळणार परत

## शासनाला चपराक : उच्च न्यायालयाचा आदेश; सात हजार विद्यार्थ्यांना होणार लाभ

नाशिक : शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये नव्याने सुरु झालेल्या अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयांतील व अस्तित्वात असलेल्या वरील प्रकारच्या महाविद्यालयांमधील नवीन शाखांमध्ये प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क परत न करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला होता. अभियांत्रिकी संघटनेच्या याचिकेवर न्यायालयात सुनावणी होऊन न्यायाधीशांच्या खंडपीठाने मंगळवार, दि. ९ रोजी दिलेल्या निकालात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क परत करण्याचे आदेश दिल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी दिली आहे.

ज्या अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयांनी 'एआयसीटीई'ला थेट अर्ज केलेला आहे व ज्या महाविद्यालयाला शासनाने नकारात्मक शिफारस दिलेली आहे अशा 'एआयसीटीई'ने मंजूर केलेल्या महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क परत करता येणार नाही असा निर्णय शासनाने घेतला होता. या निर्णयाविरोधात 'असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ अन-एडेड इंजिनिअरिंग कॉलेजेस' व 'असोसिएशन



ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ पॉलिटेक्निक्स' या संघटनांच्या वतीने न्यायालयात एकूण २५ रिट याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. यामध्ये राज्यातील अभियांत्रिकीची ९९ व तंत्रनिकेतनची ९३ अशा एकूण १९२ महाविद्यालयांचा समावेश याचिकेत होता. त्यामध्ये सुमारे सात हजार मागासवर्गीय विद्यार्थी फी प्रतिपूर्तीसाठी पात्र होते. कारण अभियांत्रिकीच्या प्रवेशासाठी ५० टक्के जागा घटनात्मकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी राखीव असून, त्यांनी या राखीव कोट्यातून केंद्रीय प्रवेशप्रक्रियेतून (कॅप) प्रवेश घेतले असतानादेखील फी परत देणार नाही असा निर्णय शासनाने घेतला होता, असे वाघ यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. विना अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या व्यवस्थापन संघटनेकडून याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करुन शासन निर्णयाला आव्हान दिले होते. यानुसार न्यायाधीश अनुप मोहता, एफ. एम. रईस यांच्या खंडपीठाने याचिका मान्य करत निकालात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी परत करण्याचा आदेश शासनाला दिला आहे. यामुळे राज्यातील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयातील सुमारे सात हजार विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना दिलासा मिळाला आहे. (प्रतिनिधी)

दै.लोकमत दि.११/९/२०१४

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शुल्कमाफी देण्याचा आदेश

**खास प्रतिनिधी, मुंबई :** २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात सुरू झालेली अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतने तसेच नव्या शाखा यात प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत.

नव्या अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन संस्थांना मान्यता न देण्याचे धोरण राज्य सरकारने गेल्या वर्षी अवलंबिले होते. तरीही काही महाविद्यालयांनी व संस्थांनी थेट 'अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदे'कडे (एआयसीटीई) मान्यतेकरिता अर्ज दाखल केले होते. या महाविद्यालयांबाबत राज्य सरकारने प्रतिकूल मत व्यक्त करूनही 'एआयसीटीई'ने त्यांना मान्यता दिली होती. म्हणून संबंधित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू न करण्याचा निर्णय सरकारने घेतला. अशा महाविद्यालयात प्रवेश घेतलेले सुमारे ७००० मागासवर्गीय विद्यार्थी या योजनेपासून वंचित होते.

'असोसिएशन ऑफ द मॅनेजमेंट्स ऑफ अन-एडेड इंजिनिअरिंग कॉलेजेस' या संघटनेने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. यात राज्यातील ९९ खासगी महाविद्यालये व ९३ तंत्रनिकेतने सहभागी झाली होती. सुमारे सात हजार विद्यार्थ्यांना न्यायालयाच्या या निर्णयामुळे दिलासा मिळाला आहे.

खासगी महाविद्यालयांमधील ५० टक्के जागा मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता राखीव असतात. या जागा केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे (कॅप) गुणवत्तेनुसार सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार भरण्यात आल्या होत्या. तरीही सरकारने या विद्यार्थ्यांना शुल्क न देण्याची भूमिका घेतली असून ती घटनाविरोधी आहे, अशी भूमिका याचिकाकर्त्या महाविद्यालयांनी घेतली होती. शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरिता केंद्र सरकार दरवर्षी ४३१ कोटी रुपये राज्याला देऊ करते. परंतु, केंद्राची परवानगी न घेता राज्याने परस्पर विद्यार्थ्यांना शुल्क देणे बंद केले, याकडे महाविद्यालयांनी लक्ष वेधले होते. महाविद्यालयांची बाजू मान्य करत मुख्य न्या. अनुप मोहता व न्या. एफ. एम. रईस यांच्या खंडपीठाने शुल्क प्रतिपूर्ती न करण्याचा सरकारचा आदेश रद्दबातल केला आहे.

दै.लोकसत्ता दि.१२/९/२०१४

# इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांना दिलासा

## फी परत करण्याचें हाय कोर्टाचे आदेश; ७ हजार जणांना होणार लाभ

**म. टा. प्रतिनिधी,** नाशिक

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये नव्याने सुरू झालेल्या अभियांत्रिकी महाविद्यालय आणि तंत्रनिकेतांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फीचा परतावा देण्यात यावा, असे आदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. राज्यभरातील इंजिनीअरिंगच्या सुमारे ७ हजार विद्यार्थ्यांना या निर्णयाचा फायदा होणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये नव्याने सुरू करण्यात आलेल्या अभियांत्रिकी आणि तंत्रनिकेतन महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी प्रतिपूर्ती न करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. सरकारच्या या निर्णयाला असोसिएशन ऑफ दी मॅनेजमेंट ऑफ अन एडेड इंजिनीअरिंग कॉलेजेसने जनहित याचिकेद्वारे आवाहन दिले होते. असोसिएशनच्या या याचिकेवर सुनावणी करण्यात आली. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती अनुप व्ही. मेहता व न्यायमूर्ती एफ. एम. रईस यांच्या खंडपीठाने या विद्यार्थ्यांच्या फीचा परतावा देण्याचे आदेश दिले आहेत.

सरकारच्या ९ मे २०१३ आणि १५ मे २०१३ च्या निर्णयांमध्ये ज्या महाविद्यालयांनी एआयसीटीईला थेट अर्ज केला आहे. वर ज्या महाविद्यालयांना सरकारने नकारात्मक शिफारस दिली आहे, अशा एआयसीटीईव्दारे मंजूर महाविद्यालयातील मागास विद्यार्थ्यांना फीची प्रतिपूर्ती देण्यात येणार नाही, असाही निर्णय सरकारने घेतला आहे. या प्रकरणी २५ जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल होत्या. यामध्ये इंजिनीअरिंगच्या ९९ आणि पॉलिटेक्निकच्या ९३ अशा १९२ महाविद्यालयांचा समावेश या याचिकांमध्ये होता. सुमारे ७ हजार मागासवर्गीय विद्यार्थी फी प्रतिपूर्तीसाठी पात्र होते.

### राज्य सरकारची उफराटी भूमिका

अभियांत्रिकी प्रवेशादरम्यान घटनात्मकदृष्ट्या ५० टक्के जागा मागासवर्गीयांसाठी राखीव आहेत. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ७ हजार विद्यार्थ्यांनी मागासवर्गीय कोट्यातून प्रवेश घेतला होता. या विद्यार्थ्यांनी केंद्रीय प्रवेश पद्धती (कॅप राऊंड) नुसार हा प्रवेश घेऊनही राज्य सरकारने त्यांना फी प्रतिपूर्ती नाकारून उफराट्या धोरणाचे प्रत्यंतर दिले.

### असोसिएशनने मांडली बाजू

मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के जागा घटनात्मकदृष्ट्या राखून ठेवल्या आहेत. यामुळे या कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शुल्क प्रतिपूर्ती नाकारता येणार नाही, अशी भूमिका असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट ऑफ अन एडेड इंजिनीअरिंग कॉलेजेसने मांडली होती. याबाबतच्या निर्णयाचा अधिकार सरकारचाच असल्याची बाजू सरकारने न्यायालयात मांडली होती.

> फीची प्रतिपूर्ती होणे हा मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा घटनात्मक हक्क आहे. राज्य सरकार तो रोखू शकत नाही, या धर्तीवर उच्च न्यायालयाने विद्यार्थ्यांच्या बाजूने जनहित याचिकेवर निकाल दिला आहे.
>
> **- बाळासाहेब वाघ,** अध्यक्ष, असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट ऑफ अन एडेड इंजिनीअरिंग कॉलेजेस

### साडेचारशे कोटींचे होते काय?

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फी प्रतिपूर्ततेपोटी केंद्र सरकारकडून राज्य सरकारला दरवर्षी सुमारे ४३१.३३ कोटींची रक्कम देण्यात येते. तरीही केंद्राच्या संमतीशिवाय राज्य सरकारने २००६ व २००७ पासून सुरू असलेली प्रतिपूर्ती योजना कशी रोखली? असाही सवाल असोसिएशनने याचिकेव्दारे उपस्थित केला होता.

दै. महाराष्ट्र टाईम्स दि.१२/९/२०१४

# फी परताव्याची 'शाळा'

▪ जितेंद्र तरटे
jitendra.tarte@timesgroup.com

**शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये नव्याने सुरू झालेल्या अभियांत्रिकी महाविद्यालय आणि तंत्रनिकेतनमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी चा परतावा देण्यात यावा, असे आदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. राज्यभरातील इंजिनीअरिंगच्या सुमारे सात हजार विद्यार्थ्यांना या निर्णयाचा फायदा होणार आहे. या निर्णयामुळे नव्याने दुकाने उघडणाऱ्या शिक्षणसंस्थांच्या चेहऱ्यावरील बुरखा फाटला आहे.**

देशाला तंत्रकुशल अन् कौशल्याधिष्ठीत मनुष्यबळ देण्यास सज्ज असल्याचा सूर व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांकडून वारंवार आळवला जातो. या उद्देशाने विद्यापीठ अनुदान आयोगासारख्या संस्थांच्या सूचना सरकारी पध्दतीने राबविण्याची कामे ही महाविद्यालय करतात अन् विद्यार्थीहिताचे आणखी चार झेंडे गाडल्याच्या आविर्भावात गवगवा करतात. या पंक्तीत बसणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या यादीत नव्याने सुरू झालेल्या महाविद्यालयांचे नाव प्राधान्याने घ्यावे लागते. शिक्षणाच्या नावाखाली नफेखोरीची गणित मांडून एज्युकेशन मॉल्स चालविणाऱ्या नव्या व्यवस्थेला सरकारही अप्रत्यक्षपणे खातपाणी घालते आहे.

गेल्या वर्षात म्हणजे २०१३-१४ मध्ये नव्याने सुरू करण्यात आलेल्या अभियांत्रिकी आणि तंत्रनिकेतन महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी प्रतिपूर्ती न करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. सरकारच्या या निर्णयाला असोसिएशन ऑफ दी मॅनेजमेंट ऑफ अन एडेड इंजिनीअरिंग कॉलेजेसने जनहित याचिकेद्वारे आवाहनही दिले होते. असोसिएशनच्या या याचिकेवर सुनावणी करण्यात आली. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती अनुप व्ही. मेहता व न्यायमूर्ती एफ. एम. रईस यांच्या खंडपीठाने या विद्यार्थ्यांच्या फी चा परतावा देण्याचे आदेशही नुकतेच दिले.

मुळात या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फी प्रतिपूर्तला राज्य सरकारने विरोध करण्याचे कारणच नसायला हवे. या परताव्यापोटी केंद्राकडून राज्याला दरवर्षी सुमारे ४३१.३३ कोटींची रक्कम मिळते. याच रकमेतून राज्याने मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फी चा परतावा करणे अपेक्षित आहे. मात्र, तरीही या निर्णयाच्या बाबतीत सरकारकडून दाखवली जाणारी उदासिनता ही शैक्षणिक धोरणांच्या भोवती संशयाचे वलय निर्माण करून जाते. हेच संदर्भ घेऊन असोसिएशनने उच्च न्यायालयात जनहित याचिका सादर केली होती. केंद्राच्या संमतीशिवाय राज्य सरकारने २००६ व २००७ पासून सुरू असलेली प्रतिपूर्ती योजना कशी रोखली? असाही सवाल असोसिएशनने जनहित याचिकेव्दारे उपस्थित केला होता. विशिष्ट उद्दीष्टाने केंद्राकडून मिळत असलेल्या रकमेबाबत केंद्राच्या संमतीशिवाय होणारा निर्णय हाच या फी परताव्यातील अडसर होता.

सरकारच्या ९ मे २०१३ आणि १५ मे २०१३ च्या निर्णयांमध्ये ज्या महाविद्यालयांनी एआयसीटीईला थेट अर्ज केला आहे. वर ज्या महाविद्यालयांना सरकारने नकारात्मक शिफारस दिली आहे, अशा एआयसीटीईव्दारे मंजूर महाविद्यालयातील मागास विद्यार्थ्यांना फीची प्रतिपूर्ती देण्यात येणार नाही, असाही निर्णय सरकारने घेतला आहे. या प्रकरणी २५ जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल होत्या. यामध्ये इंजिनीअरिंगच्या ९९ आणि पॉलिटेक्निकच्या ९३ अशा १९२ महाविद्यालयांचा

**सिटीस्कॅन : एज्युकेशन**

समावेश या याचिकांमध्ये होता. सुमारे ७ हजार मागासवर्गीय विद्यार्थी फी प्रतिपूर्तीसाठी पात्र होते.

अभियांत्रिकी प्रवेशादरम्यान घटनात्मकदृष्ट्या ५० टक्के जागा मागासवर्गीयांसाठी राखीव आहेत. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ७ हजार विद्यार्थ्यांनी मागासवर्गीय कोट्यातून प्रवेश घेतला होता. या विद्यार्थ्यांनी केंद्रीय प्रवेश पद्धती (कॅप राऊंड) नुसार हा प्रवेश घेऊनही राज्य सरकारने त्यांना फी प्रतिपूर्ती नाकारून उफराट्या धोरणाचे प्रत्यंतर दिले.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के जागा घटनात्मकदृष्ट्या राखून ठेवल्या आहेत. यामुळे या कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शुल्क प्रतिपूर्ती नाकारता येणार नाही, अशी भूमिका असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट ऑफ अन् एडेड इंजिनीअरिंग कॉलेजेसने मांडली होती. याबाबतच्या निर्णयाचा अधिकार सरकारचाच असल्याची बाजू सरकारने प्रतिज्ञापत्राव्दारे न्यायालयात मांडली होती.

कौशल्याधिष्ठीत विद्यार्थी घडविण्याचे आणि वद्यिार्थीहित जोपासण्याची भूमिका मांडणारेच या भूमिकेस विरोधक कसे ठरू शकतात, याचेच प्रत्यंतर सरकारने या प्रकरणी घेतलेल्या भूमिकेत दिसून येत होते. नव्याने उघडलेल्या महाविद्यालयांकडून फी परतावा न झाल्याने संस्थांच्याही पेक्षा कित्येक अधिक पटीने मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे.

राज्यात अगोदरच इंजिनीअरिंगच्या सीट्स गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर रिक्त राहत आहेत. विद्यार्थी संख्या, क्षमता या बाबींचा विचार न करता मागेल त्याला संस्थेचे परवाने देऊन या महाविद्यालयांचे पीक फोफावले. या भूमिकेमुळे आपलेच उत्पादन असणाऱ्या महाविद्यालयांची पाठराखण करण्याची वेळ सरकारवर येऊन ठेपली अन् त्यांचे छत्र वाचविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या फी परताव्याचा बळी जाऊ लागला. नव्या संस्थाचालकांची दुकाने चालविण्यासाठी सरकारने स्वीकारलेल्या अशा धोरणांविरोधात विरोधी संघटनांना विद्यार्थ्यांसाठी न्यायालयाचे उंबरठे चढावे लागत असतील, ते सरकार काय कौशल्याधिष्ठीत मनुष्यबळ घडविणार. समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना सोबत घेण्याची सरकारची व्यासपीठाहून मांडली जाणारी भूमिका अन् या विषयाबाबत प्रत्यक्षात घेतले जाणारे निर्णय हा विरोधाभास उघडा पडण्यासाठी हे उदाहरण बोलके ठरावे. 'मुंह मे राम, बगल मे छुरी' अशा स्वरूपाच्या व्यवस्थेविरोधात विद्यार्थी अन् विद्यार्थीहित रक्षकांनी सावध भूमिका यापुढे स्वीकारायला हवी.

महाराष्ट्र टाईम्स दि. 16/9/2014

A550